Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# वर्तमान शिक्षणातील अध्ययन अध्यापन पद्धतीमध्ये वसुधैव कुटुंबकम मूल्यांचा अंतर्भाव एक चिकित्सक अभ्यास

**शुभांगी अ. गुलवाडे**
संशोधनार्थी

**प्राचार्य डॉ.निलिमा दे. अंबाडकर**
मार्गदर्शक
एस.एस.एम.बी.एड. कॉलेज नांदगाव पेठ, जि.अमरावती

**सारांश**

प्रस्तुत शोधनिबंध वर्तमान शिक्षणातील आधुनिक अध्यापन पद्धती आणि भारतीय प्राचीन मूल्य 'वसुधैव कुटुंबकम' (संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे) याच्यातील संबंधाचा आढावा घेतो. 21 व्या शतकात शिक्षण केवळ माहिती देण्याचे साधन न राहता जागतिक नागरिक घडविण्याचे माध्यम बनले आहे. या संशोधन पेपर मध्ये वर्तमान शिक्षणाच्या अभ्यासक्रमात या मूल्याचा अंतर्भाव कसा करता येईल आणि त्याचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर काय परिणाम होतील याचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. जागतिक आव्हाने पेलण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही तर मानवी मूल्यांची जोड असणे आवश्यक आहे. प्रस्तुत शोधनिबंधात वर्तमान शिक्षणातील प्रचलित अध्ययन–अध्यापन पद्धतीचा 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) या भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून चिकित्सक आढावा घेण्यात आहे. संशोधनाचा मुख्य उद्देश्य उच्च शिक्षण पद्धतीमध्ये केवळ व्यावसायिक कौशल्य न शिकवता विद्यार्थ्यांमध्ये जागतिक नागरिकत्वाची भावना आणि नैतिक मूल्यांची रुजवन कशी करता येईल याचा अभ्यास करणे हा आहे. सध्याची मूल्यमापन पद्धती प्रामुख्याने गुणावर आधारित आहे, परंतु 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) या मूल्याचा अंतर्भाव केल्यास मूल्यमापन प्रक्रिया अधिक सर्व सर्वसमावेशक आणि मानवी दृष्टिकोन ठेवणारी होऊ शकते.

**शब्द :** 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) वर्तमान शिक्षण अध्ययन – अध्यापन पद्धती, चिकित्सक अभ्यास, मूल्यशिक्षण, जागतिक नागरिकत्व, नैतिक मूल्ये.

## प्रस्तावना

भारतीय संस्कृतीच्या महोदधीतून उगम पावलेला 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) हा विचार केवळ एक सुभाषित नसून ती एक वैश्विक जीवनसृष्टी आहे. महोपनिषदातून आलेला या विचाराचा अर्थ 'संपूर्ण पृथ्वी हे एक कुटुंब आहे' असा होतो. आजच्या 21 व्या शतकातील जागतिकरणाच्या युगात, जिथे तंत्रज्ञानामुळे भौगोलिक सीमा पुसट झाल्या आहेत तिथे हा विचार अधिक प्रासंगिक ठरत आहे. तथापि केवळ भौतिकदृष्ट्या जग जवळ येणे पुरेसे नाही ; तर मानसिक आणि अध्यात्मिक स्तरावर 'विश्वबंधुत्व' ही काळाची गरज आहे. ही गरज पूर्ण करणे केवळ शिक्षणच करू शकते. शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षण ही केवळ माहिती देणारी प्रक्रिया नसून ती चरित्र घडविणारी आणि मूल्यांची जोपासना करणारी प्रक्रिया आहे. आधुनिक शिक्षण प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासावर भर दिला जात असला तरी त्यांच्यात नैतिक आणि वैश्विक मूल्यांचा अभाव दिसून

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

येत आहे. वाढती स्पर्धा, असहिष्णुता, स्वार्थीवृत्ती आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारख्या जागतिक समस्यांवर मात करण्यासाठी 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) या मूल्यांचा अध्ययन – अध्यापन पद्धतीत अंतर्भाव करणे अनिवार्य झाले आहे. भारत सरकारच्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020' (NEP 2020) मध्ये देखील जागतिक नागरिकत्वाच्या शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये केवळ स्वतःच्या देशाबद्दलच नव्हे तर संपूर्ण मानव जाती बद्दल आणि पर्यावरणाबद्दल आत्मीयता निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय मानले गेले आहे. जेव्हा एखादा विद्यार्थी 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) हे मूल्य आत्मसात करतो, तेव्हा त्याच्यामध्ये सहिष्णुता, सहकार्य करुणा, सर्वधर्मसमभाव आणि निसर्गाप्रती कृतज्ञता यांसारख्या गुणांचा विकास होतो.

## वसुधैव कुटुंबकम संकल्पना आणि आजचे वर्तमान शिक्षण :

'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) हा संस्कृत श्लोकांश 'महोपनिषद' (अध्याय 6 श्लोक 71–73), मधून घेतला आहे याचा अर्थ 'वसुधा' (पृथ्वी) एवं (हीच) आणि 'कुटुंबकम' (कुटुंब) असा होतो. संकल्पनेनुसार संपूर्ण जग हे एका कुटुंबासारखे आहे. ज्याप्रमाणे एका कुटुंबातील सदस्य परस्पर सहकार्य, प्रेम, आदर आणि सहिष्णुतेने राहतात, त्याचप्रमाणे जगातील सर्व मानवांनी सजीवांनी आणि निसर्गाने गुण्यागोविंदाने राहणे अपेक्षित आहे. हे मूल्य कोणत्याही एका धर्मापुरते किंवा राष्ट्रापुरते मर्यादित नसून ते वैश्विक आहे.

## तात्विक अधिष्ठान :

उदारचरितांना तू 'वसुधैव कुटुंबकम : ज्याचे मन विशाल असते, त्यांच्यासाठी संपूर्ण पृथ्वी हेच घर असते. हा विचार संकुचित राष्ट्रवाद आणि प्रादेशिकवादाच्या पलीकडे पाहण्याची दृष्टी देतो ज्याप्रमाणे एका कुटुंबातील सदस्य परस्पर सहकार्य, प्रेम, आदर आणि सहिष्णुतेने राहतात, त्याचप्रमाणे जगातील सर्व मानवांनी सजीवांनी आणि निसर्गाने गुण्यागोविंदाने राहणे अपेक्षित आहे. हे विश्वबंधुत्व, ही संकल्पना व्यक्तीला 'स्व' कडून 'सर्व' कडे घेऊन जाते. 'माझे' आणि 'तुझे' या भेदापलीकडे जाऊन मानवतेचा विचार करणे हे त्याचे मूळ तत्व आहे.

## आधुनिक काळातील समर्पकता :

आजच्या डिजिटल युगात जग जवळ आले आहे. हवामान बदल, महामारी आणि आर्थिक मंदी यासारख्या समस्यांना सामोरे जाताना एक राष्ट्र म्हणून विचार करून चालत नाही. येथे 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) ही संकल्पना जागतिक नागरिकत्व म्हणून सामोरे येते. युनेस्को च्या शिक्षण : 'एक आंतरिक खजिना' च्या अहवालातही 'एकत्र राहण्यासाठी शिकणे' यावर भर दिला आहे. जो या मूल्यांची सुसंगत आहे.

## वर्तमान शिक्षणातील अध्ययन – अध्यापन पद्धती :

सध्याचे उच्च शिक्षण बहुदा स्पर्धात्मकता पाठांतर आणि रोजगारभिमुखतेवर आधारित आहे. यामध्ये मानवी मूल्यांपेक्षा तांत्रिक ज्ञानाला अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी पदव्या तर मिळवत आहे परंतु सामाजिक जबाबदारीच्या बाबतीत मागे पडत आहे. या पार्श्वभूमीवर 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) मूल्यांची गरज अधोरेखित होते.

## 'वसुधैव कुटुंबकम संकल्पना आणि वर्तमान शिक्षण' :

'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) ही केवळ एक घोषणा नसून ती एक जीवनसृष्टी आहे. उच्च शिक्षणाच्या संदर्भात या संकल्पनेचे महत्त्व खालील मुद्द्यावरून स्पष्ट होते.

**सर्वसमावेशकता :** वर्तमान शिक्षणात विविध जाती, धर्म भाषा आणि देशाचे विद्यार्थी एकत्र येतात. या सर्वांना एकाच कुटुंबात चा भाग मानणे ही या मूल्याची पहिली पायरी आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**नैतिक अधिष्ठान :** केवळ पदव्या मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर नैतिक जबाबदारीची जाणीव असणे महत्त्वाचे आहे. उच्च शिक्षण हे विद्यार्थ्यांना समाजाप्रती संवेदनशील बनवण्याचे साधन असावे.

**जागतिक समस्याचे निराकरण :–** हवामान बदल, दहशतवाद आणि गरिबी यांसारख्या समस्या कोणत्याही एका देशापुरत्या मर्यादित नाहीत. 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) ची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवल्यास ते या समस्याकडे जागतिक दृष्टिकोनातून पाहू लागतील.

**सांस्कृतिक देवाण-घेवाण :** उच्च शिक्षणातील विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) विविध योजनांद्वारे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे स्वागत केले जाते, जे या मूल्याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

**अध्ययन – अध्यापन पद्धतीत वर्तमान शिक्षणाचा अंतर्भाव :–** अध्यापन पद्धतीत बदल केल्याशिवाय ही मूल्ये विद्यार्थ्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत यासाठी खालील मार्गाचा अवलंब करता येईल.

**सहकारी अध्यापन :–** विद्यार्थ्यांना गटात काम करण्यास प्रोत्साहित करणे, ज्यामुळे त्यांच्यात सहकार्य आणि समन्वयाची भावना वाढेल.

**अनुभवात्मक शिक्षण :–** सामाजिक सेवा प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजातील विविध स्तरांतील लोकांशी संवाद साधण्याची संधी देणे.

**बहुसांस्कृतिक अभ्यासक्रम :–** इतिहासाच्या किंवा साहित्याच्या अध्यापनात जागतिक साहित्याचा समावेश करून विविध संस्कृती बदल आदर निर्माण करणे.

**तंत्रज्ञानाचा वापर :–** 'व्हर्च्युअल क्लासरूम' च्या माध्यमातून जगातील विविध देशातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून 'जागतिक गाव' ही संकल्पना प्रत्यक्ष अनुभवणे.

**उद्दिष्टे :–**

प्रचलित अध्ययन – अध्यापन पद्धतीमध्ये जागतिक मूल्यांच्या स्थानाचा शोध घेणे.
शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वैश्विक नागरिकत्वाची भावना रुजवण्याच्या पद्धतीचे विश्लेषण करणे.
अध्यापन प्रक्रियेत या मूल्यांचा अंतर्भाव करताना येणाऱ्या आव्हानांचा अभ्यास करणे.

**वर्तमानातील आव्हाने :–** या मूल्यांच्या अंमलबजावणीत काही आव्हाने आणि मर्यादा आहेत. 1) आजचे शिक्षण बाजारभिमुख झाले आहे. स्पर्धात्मकतेच्या युगात 'कुटुंब' ही भावना मार्ग पडून 'स्वार्थ' पुढे येत आहे. 2) अनुकदा केवळ परीक्षेसाठी शिकवली जाते, त्यामुळे मूल्यांचे संवर्धन होण्यास वेळ मिळत नाही. 3) शिक्षकांच्या मनात जोपर्यंत वैश्विक मूल्य ठाम नसतात तोपर्यंत ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे कठीण असते.

**चिकित्सक विश्लेषण**

**सकारात्मक बाजू :–** 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) या मूल्यांचा अंतर्भाव केला तर भविष्यातील युद्धे, पर्यावरण ऱ्हास आणि द्वेष कमी होऊ शकतो. विद्यार्थी अधिक सहिष्णू आणि समजूतदार बनतील.

**समोरील आव्हाने :–** व्यावसायिक अभ्यासक्रमांचा वाढता ताण, ग्रेड मिळवण्याची ओढ आणि पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा प्रभाव यामुळे ही भारतीय मूल्ये रुजवणे आव्हानात्मक आहे. शिक्षकांचे योग्य प्रशिक्षण हा यातला महत्त्वाचा अडथळा असू शकतो.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**सार :–** शैक्षणिक अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत या 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) मूल्यांचा अंतर्भाव कशा प्रकारे करता येईल, याचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. केवळ पाठ्यपुस्तकात या विषयाचा समावेश करून चालणार नाही, तर शिक्षकांनी आपल्या अध्यापन पद्धतीत, शाळांमधील उपक्रमात आणि प्रत्यक्ष वर्गातून हे मूल्य कसे प्रतिबिंबित करावे याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. ज्ञानरचनावादी दृष्टिकोनातून मूल्य शिक्षण देताना येणारी आव्हाने आणि त्यावर उपाययोजना यांचा वेध घेणे हा मुख्य उद्देश आहे. उद्याचा नागरिक हा केवळ कुशल व्यावसायिक नसावा, तर तो एक 'जागतिक नागरिक' असावा, जो संपूर्ण विश्वाच्या कल्याणाचा विचार करेल. या वैचारिक भूमिकेतून 'वसुधैव कुटुंबकम' या मूल्याचा शैक्षणिक चौकटीत केलेला अंतर्भाव हा मानवी अस्तित्वासाठी आणि जागतिक शांततेसाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

**निष्कर्ष :–** 'वसुधैव कुटुंबकम' (जग हे एक कुटुंब आहे) हे मूल्य केवळ भारतीय नसून ते वैश्विक आहे. 21व्या शतकातील आव्हानांना तोड देण्यासाठी मानवाला एक संघ ठेवण्याची शक्ती या विचारात आहे. अध्ययन – अध्यापन पद्धतीत बदल करून शिक्षकांनी केवळ माहितीचे 'स्त्रोत' न राहता 'मूल्य संस्काराचे वाहक' होणे गरजेचे आहे. जर आपण शिक्षणातूनही जागतिक एकात्मतेची भावना रुजवू शकलो, तरच खऱ्या अर्थाने शाश्वत विकास आणि जागतिक शांतता शक्य आहे.

## संदर्भसूची :–

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (2020) मनुष्यबळ विकास मंत्रालय अधिकृत धोरण दुवा पृ. क्र. 18–25.

UNESCO (2021) Remaining our futures together : A new social contract for education P. g 45–50.

डॉक्टर राधाकृष्णन, एस. (1948). भारतीय तत्त्वज्ञान राजपाल अँड सन्स पृ. क्र. 110–115)

पांडे, पी. (2023) Global values in higher education, Oxford University press P. g. 210.

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985